दैनिक
अदिती एक्सप्रेस

दि. ८ फेब्रुवारी २०२६
रविवार
वर्ष ४ थे
अंक ९७
किंमत २ रूपये
पृष्ठे ४
लातूर
RNINO.MHMAR/25/A1409

संपादक - गंगाधर अभंग डिगोळे उपसंपादक : डॉ. ज्ञानेश्वर विठ्ठल कल्याणे

ईमेल-aditiexpress33@gmail.com, **Website: www.aditiexpress.in**

आजचे पंचाग

- दिनांक : ८ फेब्रुवारी २०२६
- वार : रविवार
- माह (अमावस्यांत) : माघ
- माह (पूर्णिमांत) : फाल्गुन
- ऋतु : शिशिर
- आयन : उत्तरायण
- पक्ष : कृष्ण पक्ष
- तिथी : सप्तमी तिथी (९ फेब्रुवारी पहाटे ०५:०१ पर्यंत) त्यानंतर अष्टमी तिथी
- नक्षत्र : स्वाती नक्षत्र (९ फेब्रुवारी पहाटे ०५:०२ पर्यंत) त्यानंतर विशाखा नक्षत्र
- योग : गण्ड योग (९ फेब्रुवारी रात्री १२:०७ पर्यंत) त्यानंतर वृद्धि योग
- करण : विस्ती भद्रा करण (दुपारी ०३:५४ पर्यंत) त्यानंतर भाव करण
- चंद्र राशी : तूळ राशी
- सूर्य राशी : मकर राशी
- अशुभ मुहूर्त:
- राहु काळ : सायंकाळी ०५:०९ ते सायंकाळी ०६:३४ पर्यंत
- शुभ मुहूर्त:
- अभिजित : दुपारी १२:३० ते दुपारी ०१:१६
- सूर्योदय : सकाळी ०७:११
- सूर्यास्त : सायंकाळी ०६:३४
- संवत्सर : विश्वावसु
- संवत्सर(उत्तर) : सिद्धार्थी
- विक्रम संवत: २०८२ विक्रम संवत
- शक संवत: १९४७ शक संवत

पंतप्रधान मोदींच्या मलेशिया दौऱ्यामुळे
भारताच्या ॲक्ट ईस्ट धोरणाला मिळणार बळकटी

मलेशियाचे पंतप्रधान अन्वर इब्राहिम यांच्या निमंत्रणानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मलेशियाचा दोन दिवसांचा अधिकृत दौरा सुरू केला आहे. पंतप्रधानपदाची सूत्रे हाती घेतल्यापासून पंतप्रधान मोदींचा हा तिसरा मलेशिया दौरा आहे. विशेष म्हणजे पंतप्रधान मोदींच्या या दौऱ्यामुळे भारताच्या ॲक्ट ईस्ट धोरणाला कशी गती मिळते याकडे सर्वांचे लक्ष लागलेले आहे.

या भेटीदरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी मलेशियन समकक्षांसोबत द्विपक्षीय सहकार्याच्या विविध पैलूंवर व्यापक चर्चा करणार आहेत. पंतप्रधान मलेशियातील भारतीय समुदायाच्या सदस्यांशी संवाद साधतील, तसेच व्यापारी नेते आणि उद्योग प्रतिनिधींना भेट देतील. परराष्ट्र मंत्रालयाच्या म्हणण्यानुसार, ही भेट १० व्या भारत-मलेशिया सीईओ फोरमच्या निमित्ताने होणार आहे. भारत आणि मलेशियाचे जुने संबंध आहेत जे सामायिक इतिहास, संस्कृती आणि सभ्यतेमध्ये खोलवर रुजलेले आहेत.



भारताचे ॲक्ट ईस्ट धोरणाचे उद्देश आग्नेय आशिया, पूर्व आशिया आणि आशिया-पॅसिफिक प्रदेशातील देशांशी भारताचे संबंध मजबूत करणे हा आहे. हे धोरण मूलतः १९९१ मध्ये तत्कालीन पंतप्रधान पी.व्ही. नरसिंह राव यांनी स्वीकारलेल्या धोरणाशी संबंधित आहे.

पंतप्रधान मोदींच्या मलेशिया भेटीमुळे या उपक्रमाला मोठी चालना मिळण्याची शक्यता आहे. आग्नेय आणि पूर्व आशियाई देशांसोबत व्यापार, गुंतवणूक आणि तांत्रिक सहकार्य वाढवणे हे पंतप्रधान मोदींनी पदभार स्वीकारल्यापासूनचे प्रमुख ध्येय आहे. सरकारने ॲक्ट ईस्ट पॉलिसी अंतर्गत भारताला आसियान राष्ट्रांशी जोडण्यासाठी वाहतूक, पायाभूत सुविधा आणि डिजिटल कनेक्टिव्हिटी (रस्ते, रेल्वे, बंदरे आणि डिजिटल नेटवर्क) विकसित करण्यासाठी सक्रियपणे काम केले आहे.

ऑगस्ट २०२४ मध्ये भारत आणि मलेशियाने त्यांचे संबंध व्यापक धोरणात्मक भागीदारीपर्यंत वाढवले. पंतप्रधान मोदींच्या भेटीदरम्यान, दोन्ही नेते प्रगतीचा आढावा घेतील आणि या भागीदारीतील भविष्यातील प्राधान्ये निश्चित करतील. भारतात मलेशियन गुंतवणूकीला प्रोत्साहन देणे आणि सखोल आर्थिक सहकार्यासह व्यापार आणि गुंतवणूक वाढविण्यावर चर्चा होणार आहे.

काँग्रेसच्या तुष्टीकरणाच्या राजकारणामुळे देशाचे विभाजन

मुंबई : काँग्रेसच्या निवडणुकीनिमित्त आयोजित तुष्टीकरणाच्या राजकारणामुळे तुष्टीकरणाच्या राजकारणामुळे प्रचारसभेत ते बोलत होत. देशाचे विभाजन झाले. ते देशाचे विभाजन झाले आहे आणि आजही आजही तुष्टीकरण करत त्यांनी आपल्या आहेत. मात्र, आता धोरणात बदल केलेला लोक त्यांना साथ नाही. तेलंगणामध्ये देणार नाहीत. मनुष्य मोठ्या प्रमाणात कोणत्याही जातीचा लांगुलचालनाचे काम किंवा धर्माचा असो, तेथील सरकारकडून न्याय सर्वांसाठी समान सुरू आहे. या आहे. मात्र, मतांसाठी देशात जेव्हा जेव्हा सुरू असलेले तुष्टीकरण तुष्टीकरणाचे, स्वीकार्य नाही,



लांगुलचालन करण्याचे तेलंगणचे मुख्यमंत्री रेवंथ रेड्डी राजकारण झाले, त्या-त्या वेळी यांनी मुस्लिमांना दिलेल्या चार देशाला त्याचे नुकसान भोगावे टक्के आरक्षणाच्या मुद्द्यावरून लागले आहे. तरी देखील काँग्रेस केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांना पक्ष मतदानाकरता लांगुलचालन आव्हान दिले होते. मुख्यमंत्री करण्याचा प्रयत्न करत आहे, देवेंद्र फडणवीस यांनी त्यांचा असा हल्लाबोल मुख्यमंत्री देवेंद्र खरपूस समाचार घेत, कठोर फडणवीस यांनी केला. शब्दांत प्रत्युत्तर दिले आहे. तेलंगणमधील नगरपालिका फडणवीस म्हणाले, काँग्रेसच्या

गडचिरोलीत सात नक्षलवाद्यांचा खात्मा

गडचिरोली जिल्ह्यातील नक्षलविरोधी मोहिमेत सी-६० जवानांनी सात जहाल नक्षलवाद्यांचा खात्मा केला आहे. या ऑपरेशनमुळे जिल्ह्यातील नक्षल चळवळीला मोठा धक्का बसला असून, मुख्यमंत्री **(पान २ वर)**

दहावी-बारावी परीक्षेआधी पुणे प्रशासन ॲक्शन मोडवर
नियमांचे पालन न केल्यास होणार कडक कारवाई

पुणे: पुढील काही दिवसांमध्ये राज्यात सर्वत्र परीक्षांचे वारे वाहू लागणार आहेत. बारावीच्या परीक्षा १० फेब्रुवारी ते ११ मार्च, तर दहावीच्या परीक्षा २० फेब्रुवारी ते १८ मार्च दरम्यान होणार आहेत. या परीक्षेत गैरप्रकार होऊ नये यासाठी पुणे प्रशासन ॲक्शन मोडवर आलं आहे. त्यांनी यावर्षी परीक्षेसाठी नवीन नियमावली केली असून ते नियम पळाले नही तर कडक कारवाई करण्यात येणार आहे.



नवीन नियमांनुसार; परीक्षा केंद्राच्या परिसरात १०० मीटर अंतरात अनधिकृत व्यक्तींना प्रवेश बंद करण्यात आला आहे. तसेच एका विद्यार्थी सोबत दोन किंवा अधिक व्यक्तींना एकत्र येण्यास बंदी घालण्यात आली आहे. याचबरोबर सार्वजनिक टेलिफोन, एसटीडी-आयएसडी बूथ, फॅक्स केंद्रे, झेरॉक्स सेंटर, ई-मेल सेंटर, **(पान २ वर)**

अजित पवारांच्या खासगी सचिवाची कसून चौकशी

मुंबई : अजित पवारांचे बारामती विमानतळाच्या धावपट्टीजवळ विमान अपघातात निधन झाले. या प्रकरणी राज्याच्या गुन्हे अन्वेषण विभागाने अर्थात सीआयडीने अजित पवारांचे खासगी सचिव अविनाश सोलवट यांची मंत्रालयात सुमारे ४ तास कसून चौकशी केल्याचे समजते. अजितदादांच्या अपघाताच्या आदल्या रात्री या संदर्भात अविनाश सोलवट यांना वारंवार उलटसुलट प्रश्न विचारण्यात आल्याचे वृत्त आहे.

अजित पवार आधी कारने बारामतीला जाणार होते. आयत्यावेळी विमान प्रवासाचे नियोजन झाले. कार्यक्रमातला हा बदल नेमका कधी आणि का करण्यात आला. हा निर्णय कोणत्या व्यक्तीने घेतला आणि त्यापुढे आवश्यक ते नियोजन कोणी केले हे सीआयडीने जाणून घेतले. अविनाश सोलवट यांनी दिलेल्या माहितीची पडताळणी सुरू आहे. तसेच विमानाच्या ब्लॅकबॉक्समधील माहितीचे विश्लेषण करण्याचे काम तज्ज्ञ करत आहेत. विमानाचा जमिनीवर आदळण्यापूर्वीचा मार्ग आणि त्यानंतरचा स्फोट या मागील कारण समजून घेण्याचा प्रयत्न सुरू आहे.





उड्डाणाआधी विमानाची तांत्रिक तपासणी तसेच आवश्यक ती देखभाल - दुरुस्ती करणाऱ्यांचीही कसून चौकशी होणार असल्याचे समजते. अजित पवारांच्या विमानाचा अपघात हा तांत्रिक कारणामुळे झाला की त्यामागे काही षडयंत्र होते या प्रश्नाचे उत्तर सीआयडी शोधत आहे. याआधीच नागरी विमान वाहतूक संचालनालयाने तज्ज्ञांच्या मदतीने अजित पवारांच्या विमान अपघाताची चौकशी सुरू केली आहे. सीआयडी अजित **(पान २ वर)**

उपमुख्यमंत्री अजित पवार आणि भाजपचे शिवाजीराव कर्डिले यांच्या निधनामुळे जागा रिक्त

मुंबई : स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आटोपताच महाराष्ट्रात राज्यसभा निवडणुकीचे वारे वाहू लागले आहेत. मात्र, राज्यसभा निवडणुकीची घोषणा होण्याआधी बारामती आणि राहुरी विधानसभेची पोटनिवडणूक घेतली जाण्याची दाट शक्यता आहे. दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार आणि भाजप नेते शिवाजीरावर कर्डिले यांच्या निधनामुळे या जागा रिक्त झाल्या असून, निवडणूक आयोगाने पोटनिवडणुकीची तयारी सुरू केली आहे.





बारामती विधानसभा मतदारसंघाची पोटनिवडणूक उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा पवार लढवतील, हे जवळपास निश्चित मानले जात आहे. उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतल्यानंतर सहा महिन्यांच्या **(पान २ वर)**

मुंबईच्या महापौर पदासाठी रितू तावडे आणि उपमहापौर संजय घाडी यांची उमेदवारी जाहीर

मुंबई - प्रतिनिधी : मुंबई महानगरपालिकेच्या महापौर निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आज महापालिका राजकारणात मोठी आणि निर्णायक घडामोड घडली. शहराच्या नेतृत्वाच्या शिखरावर कोण विराजमान होणार, याकडे संपूर्ण मुंबईचे लक्ष लागले असतानाच प्रभाग १३२ च्या नगरसेविका आणि भाजप महिला मोर्चा संयोजिका रितू तावडे यांच्या नावाची अधिकृत घोषणा करण्यात आली. तर उपमहापौर पदासाठी संजय घाडी यांच्या नावाची घोषणा करण्यात आली.





महापालिकेतील भाजप पक्ष कार्यालयात पार पडलेल्या नगरसेवकांच्या महत्त्वपूर्ण बैठकीत भाजपचे मुंबई अध्यक्ष अमित साटम यांनी नगरसेविका रितू तावडे यांचे नाव महापौर पदाच्या उमेदवार म्हणून जाहीर केले. तावडे यांच्या नावाची घोषणा करताच उपस्थित नगरसेवकांनी जोरदार टाळ्या वाजवत पक्षाच्या या निर्णयाचे स्वागत करत त्यांना शुभेच्छा देत आनंद व्यक्त केला. भाजपच्या या पहिल्या महिला महापौर असून केल्याने राजकीय वर्तुळात उत्साहाची लाट निर्माण केली. या घोषणेमुळे सहकारी नगरसेवक आणि त्यांच्या समर्थकांमध्ये जल्लोषाचे वातावरण पाहायला मिळाले.

घोषणेनंतर तावडे यांनी पक्षाने सोपवलेली जबाबदारी विश्वासाने पेलण्यासाठी पुढे पक्षाचा विश्वास अधिक दृढ करण्याचां निर्धार व्यक्त करत जय श्रीराम...भारत माता की जय... वंदे मातरम... डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा विजय असो.. भारतीय जनता पार्टीचा... देवा भाऊ आहे बढो .. अमित साटम आगे बढो.. या घोषणांच्या गजरात आपला उमेदवारी अर्ज महापालिका सचिव मंजिरी देशपांडे यांच्याकडे अधिकृतपणे सादर केला. याप्रसंगी महापालिका गटनेते गणेश खणकर, उपनगराचे पालकमंत्री मंगल प्रभात लोढा..माजी खासदार मनोज कोटक.ज्येष्ठ नगरसेवक प्रभाकर शिंदे, शिवसेनेचे गटनेते अमेय घोले, तसेच महायुतीचे नगरसेवक उपस्थित होते.

महापौर पदासाठी ही उमेदवारी ही **(पान २ वर)**

खेळाडूंना ५ टक्के आरक्षणाचा लाभ जलदगतीने मिळण्यासाठी ब्लॉकचेन तंत्रज्ञान वापरण्यास मान्यता

मुंबई : गुणवत्ताधारक शासकीय व निमशासकीय सेवेमधील ५ टक्के आरक्षणाचा लाभ खेळाडूंना पारदर्शक, जलद व त्रुटीमुक्त पद्धतीने मिळावा, यासाठी ब्लॉकचेन व कृत्रिम बुद्धिमत्ता या अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापर करण्यास शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने मान्यता दिली असल्याची माहिती जिल्हा क्रीडा अधिकारी रश्मी आंबेडकर यांनी दिली.



रश्मी आंबेडकर म्हणाल्या की, राज्य व राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांचे आयोजन करणाऱ्या सर्व अधिकृत एकविध क्रीडा संघटनांनी स्पर्धा संपल्यानंतर ७ दिवसांच्या आत स्पर्धेचा अंतिम निकाल, सहभागी खेळाडूंची यादी तसेच गुणपत्रिका अभिलेख जतनासाठी संचालनालयाकडे अपलोड करणे बंधनकारक आहे. ही सर्व माहिती संबंधित क्रीडा संघटनेच्या अधिकृत पदाधिकाऱ्यांनी डिजिटल स्वाक्षरीद्वारे प्रमाणित करणे आवश्यक आहे.

निर्धारित कालावधीत माहिती अपलोड न केल्यास संबंधित क्रीडा संघटनांचा डिफॉल्टर यादीत समावेश करण्यात येणार आहे. तसेच खेळाडूंनी आपले **(पान २ वर)**

जिल्ह्यातील ६६१ उमेदवारांचे भवितव्य मतदान यंत्रात बंद









लातूर- लातूर जिल्हा परिषदेच्या ५९ गटांसाठी आणि पंचायत समितीच्या ११० गणांसाठी शनिवारी जिल्ह्यात मतदान प्रक्रिया शांततेत पार पडली. याला मतदारांनी उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. मतदारांनी अक्षरशा रांगा लावून आपला मतदानाचा हक्क बजावला. मतदानाची वेळ सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत होती. तरीही सायंकाळी उशिरापर्यंत मतदान केंद्रांसमोर मतदारांच्या रांगा दिसून आल्या. जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या ६६१ उमेदवारांचे भवितव्य मतदान यंत्रात बंद झाले असून सोमवारच्या निकालाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

शनिवारी सकाळी साडेसात वाजेपासून मतदानाला सुरुवात झाली. सकाळच्या सत्रात मतदानासाठी उत्साह कमी प्रमाणात दिसून आला. जिल्ह्यात सकाळी साडेनऊ वाजेपर्यंत ७.१६ टक्के मतदान झाले होते. दुपारी साडेअकरा वाजेनंतर मतदानाला गती आली. सायंकाळी साडेपाच वाजेपर्यंत जिल्हाभरात सरासरी ६३.५० टक्के मतदान झाले.

जिल्ह्यातील सर्वच राजकीय पक्षांच्या लोकप्रतिनिधींनी आपापल्या गावातील मतदान केंद्रांवर आपला मतदानाचा हक्क बजावला. राष्ट्रहितासाठी आणि लोकशाही बळकट करण्यासाठी सर्व मतदारांनी मतदानाचा हक्क बजावावा, असे आवाहनही त्यांनी मतदारांना केले.

रेणापूर तालुक्यातील गव्हाण येथेही 'सखी मतदान केंद्र' तयार करण्यात आले होते. या मतदान केंद्राला जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर यांनी भेट दिली. तसेच मतदानाला आलेल्या मतदारांचे स्वागत केले. यावेळी रेणापूरचे निवडणूक निर्णय अधिकारी संदीप कुलकर्णी, तहसीलदार प्रशांत थोरात यांच्यासह मतदान केंद्रावर नियुक्त अधिकारी उपस्थित होते. मतदान प्रक्रिया शांततेत व भयमुक्त वातावरणात पार पडण्यासाठी पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवला होता. मतदानादरम्यान किरकोळ प्रकार वगळता शांततेत मतदान प्रक्रिया पार पडली. जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या ६६१ उमेदवारांचे भवितव्य मतदान यंत्रात बंद झाले सून सोमवारच्या निकालाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

तरुणांसह वयोवृद्धांनी बजावला मतदानाचा हक्क



शिरूर आनंतपाळ - रोजी लातूर जिल्हातील जिल्हा परिषद गट व पंचायत समिती गणाच्या निवडणुकीच्या मतदानाच्या दिवशी साकोळसह शिरूर अनंतपाळ तालुक्यातील तरुणांसह वयोवृद्धांनी आपल्या मतदानाचा हक्क बजावला.

शिरूर अनंतपाळ तालुक्यातील साकोळ व येरोळ २ जिल्हा परिषद गटासाठी तर साकोळ हिसामाबाद हिप्पळगाव येरोळ ४ पंचायत समिती गणासाठी तालुक्यामध्ये शांततेत मतदान पार पडून यामध्ये तरुणांसह वयोवृद्धांनी आपल्या मतदानाचा हक्क बजावला.यावेळी मतदारांच्या चेहऱ्यावर मतदान केल्याचा आनंद पहावयास मिळत होता. निवडणुक मतदानाच्या दिवशी सरासरी ६० टक्के मतदान झाल्याचा अंदाज वर्तविला जात आहे.

यावेळी मतदान केंद्रांवर मतदारांसाठी प्राथमिक आरोग्य केंद्राच्या आशा वर्कर्स व अंगणवाडी ताई यांच्यावतीने प्रथमोपचाराची सोय करण्यात आली होती.यावेळी शिरूर अनंतपाळ पोलीस स्टेशनच्या वतीने पोलीस निरीक्षक अनंत भंडे यांच्या मार्गदर्शनाखाली चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

मुंबईकरांचा रेल्वे प्रवास सुखकर होणार का?

सध्या मध्य आणि पश्चिम रेल्वेवर सुमारे ३,२०० हून अधिक लोकल धावतात. प्रवाशांना गर्दीमुक्त आणि अद्ययावत प्रवास सुविधा देण्यासाठी २३८ वातानुकूलित लोकल चालवण्यात येणार आहेत. या नवीन वातानुकूलित लोकलमध्ये आराम दायी आसन व्यवस्था, आधुनिक रचना, ऑक्सिजन नियंत्रक व्यवस्था या करण्यात येणार आहेत. तसेच मुंबई महानगरातील रेल्वे प्रवाशांसाठी १६ हजार कोटी रुपयांचे प्रकल्प सुरू आहेत. हे प्रकल्प टप्प्याटप्प्याने केले जात आहेत, मेट्रोच्या धर्तीवर नव्या रचनेची लोकल तयार केली जाणार आहे. लोकलमध्ये ऑक्सिजन नियंत्रक प्रणाली सुरू करून, प्रवाशांचा प्रवास सुखकर होईल. गर्दी, उष्णता आणि प्रवासातील त्रास कमी करण्यासाठी हा प्रकल्प महत्त्वाचा मानला जात आहे. मुंबई रेल्वे विकास महामंडळ (एमआरव्हीसी) आणि भारतीय रेल्वे यांच्या माध्यमातून हा प्रकल्प राबवण्यात येणार असून, टप्प्याटप्प्याने या लोकल सेवेत येतील. वातानुकूलित लोकलमुळे खासगी वाहनांचा वापर कमी होऊन पर्यावरणपूरक प्रवासाला चालना मिळेल. मुंबई लोकल ही मुंबईकरांची जीवनवाहिनी मानली जाते. २३८ वातानुकूलित लोकल चालवण्यास सुरुवात केल्यास मुंबईकरांसाठी दिलासादायक ठरणार आहे. तसेच प्रवाशांचा दर्जा उंचावणार. नवीन वातानुकूलित लोकल चालवण्यास सुरुवात केल्यास एकूण प्रवाशांच्या ६० टक्के प्रवाशांचा प्रवास सुखर होण्याची अपेक्षा आहे. उपनगरीय लोकलमधून दररोज प्रवास करणाऱ्या लाखो प्रवाशांचा प्रवास सुखकर करण्यासाठी रेल्वे आणि एमआरव्हीसीमार्फत अनेक प्रकल्प राबविण्यात येत आहेत.

मुंबई उपनगरीय रेल्वेवर मुंबई अर्बन ट्रान्सपोर्ट प्रकल्प (एमयूटीपी)अंतर्गत विविध पायाभूत सेवा-सुविधा निर्माण करण्यासाठी रेल्वे मंत्रालयाने १९९९ मध्ये मुंबई रेल्वे विकास महामंडळाची (एमआरव्हीसी) स्थापना केली. नवीन लोकल, रेल्वे मार्ग उभारणे, रेल्वे स्थानकांमध्ये सुविधा उपलब्ध करून देण्याची जबाबदारी एमआरव्हीसीवर सोपविण्यात आली. यासाठी केंद्र सरकार ५० टक्के आणि राज्य सरकार ५० टक्के निधी उपलब्ध करून देत आहे. या निधीतून पश्चिम आणि मध्य रेल्वेच्या उपनगरीय विभागात विविध कामे पूर्ण करण्यात आली, तर काही कामे प्रगतिपथावर आहेत. एमआरव्हीसीने हाती घेतलेले प्रकल्प राबविण्यात अनेक अडचणी येत असल्याने ते निर्धारित वेळेत पूर्ण करण्यात अडथळे येत आहे. यामुळे प्रवाशांना जीव धोक्यात घालून लोकलमधून प्रवास करावा लागतो. स्थापनेनंतर मुंबईकरांचा रेल्वे प्रवास सुखकर करण्यासाठी एमआरव्हीसीने एमयूटीपी १ योजना तयार केली. या योजनेत नवीन लोकल, नवीन मार्गिका, रेल्वे रुळाशेजारी बॅरिकेट लावणे असे विविध प्रस्ताव तयार केले. एमयूटीपी १ टप्प्याला २००३-०४ च्या केंद्रीय अर्थसंकल्पात मंजुरी देण्यात आली. या टप्प्यात कुर्ला-ठाणे पाचवी-सहावी मार्गिका, बोरिवली-विरार तिसरी आणि चौथी मार्गिका, ९ डब्याच्या १०१ नवीन लोकल, प्रकल्पात बाधित होणाऱ्या १५ हजार ८५७ नागरिकांचे पुनर्वसन, पश्चिम-मध्य रेल्वे मार्गावर १२ डब्यांच्या लोकल सुरू करण्यात आल्या. एमयूटीपीचा पहिला टप्पा मार्च २०१२ मध्ये पूर्ण करण्यात आला. यामुळे रेल्वेची प्रवासी वाहतूक क्षमता ३६ टक्क्यांनी वाढली. हे प्रकल्प मार्गी लागतानाच एमआरव्हीसीच्या एमयूटीपी २ टप्प्याला २००८-९ च्या केंद्रीय अर्थसंकल्पात मंजुरी देण्यात आली. या प्रकल्पातील योजनांसाठी ८ हजार ८७ कोटी रुपये खर्च अपेक्षित होता. या टप्प्यातील मुंबई सेंट्रल-बोरिवली सहावी मार्गिका, सीएसएमटी कुर्ला दरम्यानच्या पाचवी-सहावी मार्गिकेचे काम प्रगतिपथावर आहे. तर ठाणे-दिवा पाचवी-सहावी मार्गिका आणि अंधेरी ते गोरेगाव दरम्यान हार्बर मार्ग विस्तार करण्याचे काम पूर्ण झाले. ऐरोली-कळवा उन्नत मार्ग २०२१-२२ मध्ये पूर्ण करण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले होते. विरार-डहाणू रोड मार्गिकेचे चौपदरीकरणाचे काम २०२२-२३ मध्ये पूर्ण होणार होते. मात्र ही कामे सध्या प्रगतिपथावर आहेत.

एमयूटीपी ३ ए टप्प्यात हार्बर मार्गिकेचा विस्तार गोरेगाव बोरिवलीपर्यंत करण्यात येणार आहे. बोरिवली-विरार दरम्यान पाचवी-सहावी मार्गिका, कल्याण-आसनगाव दरम्यान चौथी मार्गिका, कल्याण-बदलापूर दरम्यान तिसरी आणि चौथी मार्गिका, तर लांब पल्ल्याच्या आणि उपनगरीय लोकलसाठी कल्याण यार्डची कामे प्रगतिपथावर आहेत. तसेच १९१ वातानुकूलित रेक उपनगरीय रेल्वेच्या ताफ्यात येणार आहेत. या सर्व कामांसाठी तब्बल ३३ हजार ६९० रुपये खर्च अपेक्षित आहे. एमयूटीपी २ अंतर्गत मध्य रेल्वेमार्फत छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस-कुर्ला पाचवा व सहावा मार्ग प्रकल्प राबविण्यात येत आहे. या प्रकल्पाचा अंदाजे खर्च ८९१ कोटी रुपये आहे. एमयूटीपी ३ अंतर्गत पनवेल- कर्जत उपनगरीय कॉरिडॉर प्रकल्प अंदाजे २ हजार ७८२ कोटी रुपये खर्चाचा आहे. हा प्रकल्प डिसेंबर २०२५ पर्यंत पूर्ण होणार असल्याचे मध्य रेल्वेने म्हटले होते. मात्र हा प्रकल्पही पूर्ण होण्यास काही महिने वाट पाहावी लागणार आहे. एमयूटीपी ३ अ अंतर्गत मध्य रेल्वेमार्फत कल्याण-आसनगाव ४था मार्ग प्रकल्प राबविण्यात येत आहे. हा प्रकल्प डिसेंबर २०२६ पर्यंत पूर्ण करण्याचे रेल्वेचे उद्दिष्ट आहे. एमयूटीपी २ अंतर्गत मुंबई सेंट्रल-बोरिवली सहावा मार्ग प्रकल्प हाती घेण्यात आला. या प्रकल्पासाठी ९१९ कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. या प्रकल्पातील कांदिवली-बोरिवली दरम्यानचे काम प्रगतिपथावर आहे. एमयूटीपी ३ अ अंतर्गत गोरेगाव-बोरिवली हार्बर लाइन विस्तार प्रकल्प राबविण्यात येत आहे. हा प्रकल्प ८९८ कोटी खर्चाचा असून सध्या या प्रकल्पासाठी भूमी संपादनाचे काम प्रगतिपथावर आहे. गोरेगाव-मालाड दरम्यान मार्च २०२८ पर्यंत हा प्रकल्प पूर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे, तर मालाड-बोरिवली विभागात डिसेंबर २०२८ पर्यंत प्रकल्प पूर्ण करण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले. विरार-डहाणू तिसरा व चौथा मार्ग प्रकल्प डिसेंबर २०२६ मध्ये पूर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे. मात्र हे उद्दिष्ट वेळीच पूर्ण झाले तरच प्रवाशांचा प्रवास सुखकर होईल व अपघातांना आळा बसेल.

परदेशी उच्च शिक्षणासाठी ४० जणांना शिष्यवृत्ती

धाराशिव, - अनुसूचित जमाती प्रवर्गातील गुणवंत विद्यार्थ्यांना परदेशातील नामांकित विद्यापीठांमध्ये उच्चशिक्षणाची संधी मिळावी आणि त्यांच्या गुणवत्तेला जागतिक स्तरावर वाव मिळावा, या उद्देशाने महाराष्ट्र शासनाच्या आदिवासी विकास विभागामार्फत परदेशात शिक्षणासाठी शिष्यवृत्ती योजना राबविण्यात येत आहे.

शिष्यवृत्ती योजनेंतर्गत सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षासाठी ४० गुणवंत आदिवासी तरुण-तरुणींना शिष्यवृत्तीचा लाभ देण्यात येणार असून, इच्छूक व पात्र विद्यार्थ्यांकडून ऑनलाईन अर्ज मागविण्यात आले आहेत. या योजनेंतर्गत परदेशातील नामांकित विद्यापीठांमध्ये प्रवेश मिळालेल्या अनुसूचित जमातीच्या ४० विद्यार्थ्यांना शैक्षणिक खर्च भागविण्यासाठी शिष्यवृत्ती दिली जाणार आहे. या शिष्यवृत्तीमध्ये शिक्षण व परीक्षा शुल्क, निर्वाह भत्ता (निवास व भोजन), शैक्षणिक आकस्मिक व इतर खर्च, विमान प्रवास खर्च, व्हिसा शुल्क तसेच आरोग्य विमा यांचा समावेश आहे. शैक्षणिक आकस्मिक किंवा इतर खर्चासाठी युएसए व इतर देशांसाठी (युके वगळून) दरवर्षी १५०० युएस डॉलर, तर युकेसाठी दरवर्षी ११०० जीबीपी इतकी रक्कम देण्यात येणार आहे. लाभार्थी विद्यार्थ्यांच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न आठ लाख रुपयांपर्यंत असणे तसेच संबंधित विद्यापीठाची क्यूएस वर्ल्ड रँकिंग २०० च्या आत असणे बंधनकारक आहे. विहित निकषानुसार विद्यार्थी उपलब्ध न झाल्यास उत्पन्न मर्यादा १० लाख रुपयांपर्यंत शिथिल करण्यात येईल, तसेच क्यूएस वर्ल्ड रँकिंग मर्यादा २०० पासून पुढे चढत्या क्रमाने ३०० पर्यंत ग्राह्य धरण्यात येईल. परदेशात उच्च शिक्षणासाठी आवश्यक असलेल्या प्रवेश परीक्षा उत्तीर्ण होणे विद्यार्थ्यांसाठी अनिवार्य आहे.

चबुतऱ्यासोबतच बसवण्णांचा पुतळा दुरुस्ती देखील सुरु

शहर-जिल्ह्यातील बसवप्रेमींनी अचानक केली पाहणी



सोलापूर(प्रतिनिधी): शहर जिल्ह्यातील बसव प्रेमींनी एकदिवसीय लाक्षणिक उपोषण केल्यानंतर ज्या पद्धतीने जगतज्योती महात्मा बसवेश्वर यांच्या पुतळ्याच्या चबुतऱ्याचे काम सुरू करण्यात आले. त्याचबरोबर पुतळा दुरुस्तीचे देखील काम सुरू करण्यात आल्याची माहिती शहर-जिल्ह्यातील बसवप्रेमींनी त्या कामाची काल शनिवारी अचानक जाऊन पाहणी केली तेंव्हा समजली.

१९ मे २०२५ ला तो पुतळा महापालिकेने नियुक्त केलेल्या बसव ब्रिगेडच्या देखरेखीखाली व मूर्तिकार महेश शहाणे यांच्या मार्गदर्शनाखाली चबुतऱ्यावरून हटवून त्यांच्या स्टुडिओमध्ये नेऊन ठेवण्यात आला. मात्र गेली ७ महिने तो पुतळा जैसे थे परिस्थितीत होता. लाक्षणिक उपोषण होईपर्यंत त्या पुतळ्याच्या दुरुस्तीला देखील सुरुवात झाली नव्हती.

मात्र काल शनिवारी बसव प्रेमींनी अचानक त्यांच्या स्टुडिओला भेट दिली. तेव्हा पुतळ्याच्या दुरुस्तीला प्रारंभ झालेला दिसून आला. यंत्राच्या सहाय्याने पुतळ्यावर जमलेला रंगांचा थर हटवण्याचे काम सुरू होते.

यावेळी उपस्थित बसवप्रेमींना मूर्तिकार महेश शहाणे यांनी सांगितले की पहिल्यांदा पुतळ्यावरील रंगाचा थर हटवणार. त्यानंतर ज्या ठिकाणी पुतळ्याला भेगा आहेत. त्या भेगा ब्रांझ धातूच्या साह्याने बुजवून घेणार. पुतळ्याच्या धडाचा भाग आणि कमरेच्या भागादरम्यान मोठी फट राहिली होती. त्यातून पावसाचे पाणी पुतळ्यामध्ये जात होते. त्यामुळे पुतळ्याची झीज होण्यास प्रारंभ झालेला होता. ती फट देखील ब्रांझ धातूच्या साह्याने बुजवून घेण्यात येणार आहे. सर्वात शेवटी पुतळ्याला रंगकाम केले जाणार आहे.

यावेळी बसव ब्रिगेडचे अध्यक्ष अमित रोडगे, वीरशैव व्हिजनचे संस्थापक अध्यक्ष राजशेखर बुरकुले, वीरशैव व्हिजन उत्सव समितीचे अध्यक्ष विजयकुमार बिराजदार, बसव ब्रिगेड शहर सचिव राहुल जत्ती, सहसचिव अविनाश बिराजदार, लक्ष्मीकांत बिराजदार, मल्लाडे, अभिषेक पाटील आदी बसवप्रेमी उपस्थित होते.

पुतळा मे महिन्यात आमच्या स्टुडिओमध्ये आणण्यात आला होता. आम्ही त्याचे काम सुरू केले आहे. दिड महिन्याच्या आत आम्ही तो पुतळा दुरुस्ती आणि रंगरंगोटी करून चबुतऱ्यावर स्थापन करणार आहोत. तिथे पुतळा १९८२ साली स्थापन करताना ज्या स्थितीत होता त्या स्थितीत दिसेल.

– महेश शहाणे
मूर्तिकार

कळंब तालुक्यात ८४.२७ टक्के टपाली मतदान

कळंब, दि. ७ - तालुक्यातील जिल्हा परिषद गटांतर्गत पार पडलेल्या टपाली मतदानाची प्रक्रिया नुकतीच पार पडली. १ ते ५ फेब्रुवारी या कालावधीत झालेल्या या प्रक्रियेत मतदारांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला असून, तालुक्यात एकूण ८४.२७ टक्के टपाली मतदान झाले आहे. विशेष म्हणजे मंगरुळ गटाने मतदानात अव्वल स्थान पटकावले आहे.

प्रशासनाने दिलेल्या आकडेवारीनुसार, तालुक्यातील एकूण ८ जिल्हा परिषद गटांमध्ये मिळून ६५५ पात्र टपाली मतदार होते. त्यापैकी ५५२ मतदारांनी आपल्या मतदानाचा हक्क बजावला. मंगरुळ आणि ईटकूर गटात चुरस तालुक्यातील गटांनुसार विचार केला असता, गट क्र. १० मधील मंगरुळ गटात सर्वाधिक ९१.६७ टक्के मतदान झाले. येथे ७२ पैकी ६६ मतदारांनी मतदान केले. त्यापाठोपाठ गट क्रमांक ९ मधील ईटकूर गटात ८९.०४ टक्के मतदान झाले असून ७३ पैकी ६५ मतदारांनी आपला हक्क बजावला.

डिकसळ गटात ९१ पैकी ८० मतदान (८७.९१ टक्के), शिराढोणमध्ये ८१ पैकी ७१ मतदान (८७.६५), नायगांव ९२ पैकी ८० मतदान (८६.९६), मोहा ७० पैकी ५६ मतदान (८० टक्के) खामसवाडीत ५८ पैकी ४६ मतदान (७९.३१ टक्के), येरमाळा ११८ पैकी ८८ मतदान (७४.५८ टक्के) येरमाळा गटात सर्वाधिक ११८ मतदार असूनही तिथे मतदानाची टक्केवारी सर्वात कमी (७४.५८ टक्के) राहिली आहे. मात्र, एकूणच तालुक्याचा विचार करता ८४ टक्क्यांहून अधिक झालेले मतदान हे प्रशासकीय दृष्टीने समाधानकारक मानले जात आहे.

मुंबईच्या समुद्रात संशयास्पद बोटी..

मुंबई- भारतीय तटरक्षक दलाने ५ आणि ६ फेब्रुवारी २०२६ रोजी अत्यंत बारकाईने आखलेल्या समुद्र-हवाई कारवाईद्वारे आंतरराष्ट्रीय तेल तस्करी रॅकेटचा यशस्वीपणे पर्दाफाश केला. या कारवाईत संघर्षग्रस्त प्रदेशांतून उगम पावलेल्या मोठ्या प्रमाणातील तेल आणि तेलाधारित मालाच्या बेकायदेशीर हस्तांतरणात सहभागी असलेल्या गुंतागुंतीचे जाळे नष्ट केले.

मिळालेल्या माहितीनुसार, ५ फेब्रुवारी २०२६ रोजी मुंबईच्या पश्चिमेला सुमारे १०० नॉटिकल मैलांवर भारतीय तटरक्षक दलाच्या जहाजांनी तीन संशयित बोटी अडवल्या. बोटींची सखोल तपासणी, त्यावर सापडलेल्या इलेक्ट्रॉनिक माहितीची पडताळणी, कागदपत्रांची छाननी आणि कर्मचाऱ्यांची सविस्तर चौकशी केल्यानंतर तटरक्षक दलाच्या पथकाला संपूर्ण घटनाक्रम समजला. हा गुन्हेगारी प्रकार असल्याची खात्री पटली.

या तस्करी साखळीच्या कार्यपद्धतीनुसार, स्वस्त तेल समुद्री जहाजांद्वारे वाहून नेले जात असे आणि आंतरराष्ट्रीय पाण्यात समुद्राच्या मधोमध ते मोटर टँकरमध्ये हस्तांतरित केले जात असे. प्राथमिक तपासातून असे निष्पन्न झाले की या साखळीत अनेक देशांत कार्यरत असलेले सूत्रधार सहभागी होते. ते समुद्रातील जहाजांदरम्यान मालाची विक्री आणि हस्तांतरण यांचा समन्वय साधत होते. भारतीय तटरक्षक दलाच्या तंत्रज्ञान-सक्षम देखरेख प्रणालींनी भारतीय विशेष आर्थिक क्षेत्रात संशयास्पद हालचाली करणाऱ्या एका मोटर टँकरचा शोध घेतल्यानंतर ही कारवाई सुरू करण्यात आली. त्यानंतर जहाजांच्या हालचालींच्या डिजिटल तपासणी आणि माहितीच्या नमुन्यांचे विश्लेषण करण्यात आले. त्यातून त्या टँकरकडे येत असलेल्या आणखी दोन जहाजांची ओळख पटली. ही जहाजे तेलाधारित मालाचा बेकायदेशीर जहाज-ते-जहाज हस्तांतरण करत असल्याचा संशय व्यक्त करण्यात आला, ज्याद्वारे भारतासह किनारी देशांना देय असलेल्या मोठ्या महसुली शुल्कांपासून बचाव केला जात होता.

पान १ वरून

काँग्रेसच्या तुष्टीकरणाच्या...

फडणवीस यांनी जवानांचे कौतुक करत अभिनंदन केले. फडणवीस म्हणाले की, गडचिरोलीत नक्षलवाद्यांची एकच कंपनी शिल्लक होती, आणि त्या कंपनीतील प्रमुख सात नक्षलवाद्यांचा खात्मा करण्यात पोलिसांना यश आले आहे. हे ऑपरेशन दुर्गम आणि घनदाट जंगलात पार पाडण्यात आले, आणि तीन दिवस सलग पोलिसांनी रणनीती आखून दोन बाजूंनी घेरा घालून नक्षलवाद्यांना अडवले. या चकमकीत नक्षल संघटनेचा महत्त्वाचा नेता प्रभाकर याचा खात्मा झाला. प्रभाकर कंपनी क्रमांक-१० चा प्रभारी असून, गडचिरोली विभागीय कमिटी आणि वेस्ट सब-झोनल ब्युरोचा प्रमुख होता. त्याच्यावर २५ लाख रुपयांचे बक्षीस जाहीर केले गेले होते. मोहिमेत पोलिसांनी संयम, धैर्य आणि अचूक नियोजन यामुळे परिस्थिती नियंत्रणात ठेवली, तरीही एक पोलीस जवान शहीद झाला. शासन त्यांच्या कुटुंबीयांच्या पाठीशी उभे राहील, असे आश्वासन मुख्यमंत्र्यांनी दिल

दहावी-बारावी...

इंटरनेट सुविधा, आणि कॅफे बंद ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

तसेच परीक्षा केंद्राच्या परिसरात आणि त्यासभोवतालच्या १०० मीटरच्या अंतरात मोबाईल फोन, वायरलेस सेट, ट्रान्झिस्टर, रेडिओ, कॅल्क्युलेटर, लॅपटॉप यांसारखी साधने जवळ बाळगणे किंवा वापरण्यावर पूर्णपणे मनाई आहे.

या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांवर भारतीय दंड संहितेच्या कलम २२३ अंतर्गत कारवाई करण्यात येणार आहे.

अजित पवारांच्या...

पवारांच्या निवडक जवळच्या लोकांची कसून चौकशी करत असल्याचे समजते. तपासाचा भाग म्हणून ही प्रक्रिया सुरू आहे. अद्याप कोणावरही थेट संशय व्यक्त करण्यात आलेला नाही. तसेच कोणालाही पकडण्यात आलेले नाही.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार नागरी विमान वाहतूक संचालनालयाने नेमलेल्या समितीचे तज्ज्ञ विमानाचा वेग, उंची, इंजिनचे तापमान आणि पायलटमधील संभाषणाचे तांत्रिक विश्लेषण करत आहे. विमानाचे अवशेष प्रयोगशाळेत पाठवून स्फोटाचं स्वरूप आणि आगीचं कारण जाणून घेतलं जाईल. अपघाताचे कारण मानवी चूक, तांत्रिक बिघाड की घातपात या शक्यतांचीही पडताळणी होणार आहे.

उपमुख्यमंत्री अजित...

आत विधानसभा वा विधानपरिषदेचे सदस्य होणे बंधनकारक असल्यामुळे ही पोटनिवडणूक आवश्यक ठरली आहे. बारामतीत अन्य कोणताही पक्ष उमेदवार देणार नाही, हेही स्पष्ट असल्यामुळे ही निवडणूक बिनविरोध होण्याची शक्यता अधिक आहे. सुनेत्रा पवार बारामतीतून पोटनिवडणूक लढवतील, तर पार्थ पवार राज्यसभेत जाण्याची शक्यता आहे.

ऑक्टोबर २०२४ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत भाजपच्या शिवाजीराव कर्डिले यांनी राष्ट्रवादीच्या (शरद पवार) प्राजक्त तनपुरे यांना पराभूत केले होते. राहुरीचे प्रतिनिधित्व करत असताना त्यांनी अनेक प्रकल्प यशस्वीपणे राबवले, परंतु प्रकृती अस्वस्थ्यामुळे त्यांना काही काळ सार्वजनिक जीवनापासून दूर राहावे लागले. १७ ऑक्टोबर २०२५ रोजी आजारपणामुळे त्यांचे निधन झाले. लोकप्रतिनिधीच्या निधनानंतर सहा महिन्यांत पोटनिवडणूक घेणे आयोगासाठी बंधनकारक आहे. आयोगाने यासाठी संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रम जाहीर केला आहे. शिवाजीराव कर्डिले यांच्या जागी त्यांचे पुत्र अक्षय कर्डिले यांना भाजपकडून संधी मिळू शकते, तर राष्ट्रवादीकडून माजी मंत्री प्राजक्त तनपुरे रिंगणात उतरतील, असे बोलले जात आहे. मात्र सहानुभूतीची लाट पाहता शरद पवार नेमका काय निर्णय घेतात, हे पाहणे औत्सुक्याचे ठरेल.

विनोद तावडे राज्यसभेवर जाणार?

महाराष्ट्रातून राज्यसभेच्या सात जागा रिक्त होत असून, खासदार होण्यासाठी मोठ्या नेत्यांकडून लॉबिंग सुरू झाले आहे. भाजपचे राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे यांना राज्यसभेवर पाठवले जाण्याची शक्यता आहे. २०१९ मध्ये विधानसभेची उमेदवारी नाकारल्यानंतर त्यांनी राष्ट्रीय पातळीवर काम सुरू केले. बिहार विधानसभा निवडणूक असो किंवा संघटनात्मक जबाबदाऱ्या, तावडे हे विश्वासू नेता ठरले आहेत. त्यामुळे या वेळी त्यांना राज्यसभेवर पाठवणे योग्य ठरेल, असे पक्षातील नेत्यांचे मत आहे. याशिवाय रामदास आठवले यांना पुन्हा संधी मिळू शकते, तसेच डॉ. विनय सहस्रबुद्धे यांचे नावही चर्चेत आहे. भाजपच्या चार जागांपैकी एक जागा महिला उमेदवारासाठी राखली जाऊ शकते, त्यामुळे विजया रहाटकर यांना पुन्हा संधी मिळेल, अशा चर्चा आहेत. या सगळ्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भूमिका महत्त्वाची असून, त्यांच्या पसंतीच्या नावांवर केंद्रात अंतिम निर्णय होईल.

राज्यसभेची गणिते

२ एप्रिल रोजी महाराष्ट्रातील सात राज्यसभा खासदार निवृत्त होणार आहेत. यात शरद पवार, रामदास आठवले, प्रियांका चतुर्वेदी, रजनी पाटील आणि फौजिया खान यांचा समावेश आहे. हे सर्व खासदार २०२० मध्ये निवडून गेले होते, तेव्हा राज्यात महाविकास आघाडीचे सरकार होते. मात्र, तर आज राजकीय परिस्थिती पूर्णपणे बदलली आहे. राज्यसभेच्या निवडणुकीत विधानसभेतील आमदार मतदान करतात. एका खासदारासाठी साधारणपणे ३७ आमदारांचा कोटा लागतो. सध्या शरद पवार गटाकडे १०, काँग्रेसकडे १६ आणि उबाठा गटाकडे २० आमदार आहेत. एकत्रितपणे ही संख्या फक्त ४६ आहे, त्यामुळे महाविकास आघाडीला फक्त एक जागा मिळण्याची शक्यता आहे.

दुसरीकडे महायुतीची स्थिती बळकट आहे. भाजपकडे १३२, शिवसेनेकडे ५७ आणि अजित पवारांच्या राष्ट्रवादीकडे ४० आमदार आहेत. मित्रपक्षांसह त्यांचे एकूण संख्याबळ २३५ होते. त्यामुळे महायुतीचे किमान सहा उमेदवार राज्यसभेत निवडून जाण्याची शक्यता आहे, त्यापैकी भाजपला चार जागा मिळतील.

मुंबईच्या महापौर...

मुंबईच्या विकासाच्या आणि सक्षम नेतृत्वाच्या दृष्टीने महत्त्वाची महत्वाची मानली जात असून सातम यांनी पक्षाने दाखवलेल्या विश्वासाबद्दल पक्ष नेतृत्वाचे आभार मानत त्यांच्या विश्वास मुंबईच्या विकासाचा रथ जलदगतीने पुढे नेण्याचा प्रयत्न करत सार्थ ठरवेन अशी प्रतिक्रिया प्रसार माध्यमांशी बोलताना व्यक्त केली.

दरम्यान, उपमहापौर पदासाठीही एक महत्त्वपूर्ण नाव पुढे आले असून दहिसरमधील नगरसेवक संजय घाडी यांची शिवसेनेच्या वतीने करण्यात आली. पक्षाचे सरचिटणीस राहुल शेवाळे यांनी घाडी यांच्या नावाची घोषणा केली. मात्र, हा कालावधी अडीच वर्षाऐवजी सेवा वर्षांचा असेल असे जाहीर केले. त्यानंतर महायुतीच्या सर्व नगरसेवकांसोबत जात त्यांनी उपमहापौर पदाचा आपला उमेदवारी अर्ज महापालिका सचिव मंजिरी देशपांडे यांच्याकडे सादर केला.

रितू तावडे यांचा परिचय

रितू तावडे या घाटकोपर पूर्व मधील प्रभाग १३२मधून निवडून आल्या आहेत. सन २०१२मध्ये प्रथम निवडून आल्यांनतर शिक्षण समितीचे अध्यक्षपद त्यांनी भूषवले आहे. आक्रमक आणि अभ्यासू असे त्यांचे व्यक्तिमत्व आहे. नगरसेवक काळात दुकानांबाहेर महिलांचे कपडे प्रदर्शित केले जाणारे पुतळे अर्थात मॅनीक्विन हटवण्याची जोरदार मागणी त्यांनी आपल्या नगरसेवक काळात केली होती, तसेच सध्या मुंबई भाजपाच्या महिला संयोजिका

संजय घाडी यांचा परिचय

संजय घाडी हे मागाठने विधानसभेतील नगरसेवक म्हणून दुसऱ्यांदा निवडून आले आहेत. पूर्वी शिवसेना आणि त्या नंतर मनसेमध्ये आणि पुन्हा उबाठा शिवसेना आणि तिथून पुन्हा शिवसेना असा त्यांचा प्रवास आहे. मागील काळात त्यांनी स्थायी समिती सदस्यत्व भूषवले होते.

खेळाडूंना ५ टक्के...

'क्रीडा ई-प्रमाणपत्र' क्रीडा विभागाच्या अधिकृत संकेतस्थळावर अपलोड करणे आवश्यक आहे. दोन्ही बाजूंनी अपलोड करण्यात आलेल्या माहितीची ऑनलाईन पद्धतीने पडताळणी केली जाणार आहे.या नव्या प्रणालीमुळे खेळाडूंना पडताळणीसाठी प्रत्यक्ष विभागीय कार्यालयात येण्याची किंवा कागदपत्रे सादर करण्याची आवश्यकता भासणार नाही. त्यामुळे खेळाडूंना ५ टक्के आरक्षणाचा लाभ अधिक जलद व सुलभपणे मिळणार आहे. यासाठी खेळाडू व संबंधित क्रीडा संघटनांनी क्रीडा विभागास पूर्ण सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी रश्मी आंबेडकर यांनी केले आहे.

Printed by, Owned by, Published by & Edited by GANGADHAR ABHANG DIGOLE , Printed by GHONE NARASHINHA PANDURANG, Printed at Magic Publication, Shop No.10, MANAPA SHOPING COMPLEX, GANDHI CHOWK, LATUR, Tq.& Dist. LATUR - 413512 & Published at H.No.255, Shri SAI SCHOOL NEAR, Sona Nagar, Barshi Road, LATUR, DIST- LATUR-413512 Tq.& Dist. PARBHANI - 431401 MAH. Editor : GANGADHAR ABHANG DIGOLE RNINO.MHMAR/25/A1409

हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक- गंगाधर अभंग डिगोळे यांचे करीता घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १० मनपा शॉपिग कॉम्पलेक्स, गांधी चौक, लातूर - ४१३५१२ येथे छापून कार्यालय घर नं. २५५, श्री साई स्कूल निअर सोना नगर, बार्शी रोड, लातूर, ता. जि. लातूर . - ४१३५१२, येथे प्रकाशित केले. संपादकः गंगाधर अभंग डिगोळे मो.९४०५२९५२०, ९०२८८४५२३३ RNINO.MHMAR/25/A1409

मिनी मंत्रालयासाठी अंदाजे ६५ टक्के मतदान









धाराशिव, - ग्रामीण भागाच्या विकासाचे माध्यम असलेल्या जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीसाठी शनिवारी जिल्ह्यातील एक हजार ३०८ मतदान केंद्रांवर शांततेत मतदान प्रक्रिया पार पडली. प्रत्येक दोन तासाला सरासरी १४ टक्क्यांनी मतदानाचा टक्का वाढत होता. दुपारी ३.३० वाजेपर्यंत ५०.०७ टक्के तर सायंकाळी मतदान प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत अंदाजे ६५ टक्के मतदान झाले. दोन्ही स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत उतरलेल्या एकूण ६२७ उमेदवारांचे देव सोमवारपर्यंत पाण्यात असणार आहेत. मिनी मंत्रालयावर नेमकी कोणत्या पक्षाची सत्ता येणार, याचे चित्र सोमवारीच निवडणूक निकालानंतर स्पष्ट होणार आहे.

जिल्हा परिषदेच्या ५५ जागांसाठी यावेळी २३४ जणांनी विविध राजकीय पक्ष आणि अपक्ष म्हणून निवडणूक लढवली आहे. तुळजापूर, धाराशिव, कळंब, उमरगा आणि परंडा तालुक्यातील जिल्हा परिषद गटांतील लढती लक्षवेधी ठरल्या आहेत. धाराशिव, कळंब, उमरगा, परंडा, तुळजापूर, लोहारा, वाशी आणि भूम पंचायत समित्यांच्या एकूण ११० जागांसाठी एकूण ३९३ उमेदवारांनी निवडणूक रिंगणात उडी घेतली होती. बहुतांश पंचायत समिती गणांमध्येही अत्यंत चुरशीची व वर्चस्वाची लढत झाली. जिल्ह्यातील तेर, बेंबळी, केशेगाव, कवठा, नाईचाकूर, जवळा, डिकसळ, मंगरूळ या गटांमध्ये आणि गणांमध्ये लक्षवेधी लढती झाल्या आहेत. महायुतीतील उमेदवारांच्या विजयासाठी भाजपाचे आमदार राणाजगजितसिंह पाटील, माजी आमदार सुजितसिंह ठाकूर, माजी खासदार रवींद्र गायकवाड, माजी आमदार ज्ञानराज चौगुले, आमदार तानाजी सावंत यांनी तर महाविकास आघाडीतील उमेदवारांच्या विजयासाठी माजी खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर, आमदार कैलास पाटील, आमदार प्रवीण स्वामी यांनी परिश्रम घेतले. यातून कोणत्या पक्षातील उमेदवार कोणास सरस ठरले, हे निवडणूक निकालानंतर समोर येणार आहे.

दरम्यान जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीसाठी शनिवारी मतदान प्रक्रिया पार पडली. जिल्ह्यातील एक हजार ३०८ मतदान केंद्रांवर सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत अंदाजे ६५ टक्के मतदान झाले. सकाळी ७.३० वाजता प्रत्यक्ष मतदान प्रक्रियेस प्रारंभ झाला. पुढील दोन तासात केवळ ७.४७ टक्के मतदान झाले. त्यानंतर ९.३० ते ११.३० या वेळेत २१.८९ टक्के मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला. तसेच ११.३० ते १.३० पर्यंत ३६.६० टक्के तर १.३० ते ३.३० वाजेच्या दरम्यान ५०.०७ टक्के मतदान नोंदविले गेले. यात सर्वाधिक भूम तालुक्यात ५४.१८ टक्के मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. तर सर्वात कमी लोहारा तालुक्यातील ४६.७१ टक्के मतदारांनी मतदान केले. वाशीमध्ये ५४.५३ टक्के, धाराशिवमध्ये ४७.४१, परंडा तालुक्यात ५२.८३, तुळजापूरमध्ये ५१.२४ तर उमरगा तालुक्यात ४८.९७ टक्के मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला.

खळबळजनक! पैसे वाटपाबाबत सावंतांची ऑडिओ क्लिप व्हायरल

धाराशिव, दि. ७ - जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीच्या मतदानाच्या दिवशीच धाराशिव जिल्ह्यासह संपूर्ण महाराष्ट्राच्या राजकीय वर्तुळात एक मोठी खळबळ उडाली आहे. शिंदे गटाचे आमदार आणि राज्याचे माजी मंत्री तानाजी सावंत यांची एक ऑडिओ क्लिप सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल झाली असून, यामध्ये ते मतदारांना पैसे वाटपाबाबत आपल्या कार्यकर्त्यांशी संवाद साधत असल्याचा खळबळजनक दावा केला जात आहे.

व्हायरल झालेल्या या ऑडिओ क्लिपमध्ये तानाजी सावंत आपल्या कार्यकर्त्याला निवडणूक जिंकण्यासाठी पैशांची चिंता करू नका, असे सांगताना ऐकू येत आहेत. 'कोटी-दोन कोटी काय लागतील ते जाऊ दे', असे विधान त्यांनी केल्याचे या क्लिपमध्ये समोर आले आहे. विशेषतः पैशांच्या व्यवहाराबाबतचे तपशील व्हॉट्सपवर कळवण्याच्या सूचना त्यांनी कार्यकर्त्याला दिल्या आहेत. तसेच, पैशांवर किती मतदार घेता येतील, याची यादी पाठवण्यासही त्यांनी सांगितले आहे. या संवादादरम्यान सावंत यांनी धाराशिव जिल्ह्यातील शिरसाव, हिंगणगाव, जवळा आणि वाकडी या चार गावांचा विशेष उल्लेख केला आहे. या गावांमध्ये आपल्याला कोणत्याही परिस्थितीत मागे पडायचे नाही, अशा कडक सूचना त्यांनी कार्यकर्त्यांना दिल्या आहेत. ऑडिओ क्लिप मोठ्या प्रमाणात व्हायरल झाली असली आणि त्यातील आवाज तानाजी सावंत यांचाच असल्याचे बोलले जात असले, तरी दैनिक संचार किंवा अन्य अधिकृत यंत्रणेने या क्लिपच्या सत्यतेची अद्याप पुष्टी केलेली नाही. मात्र, मतदानाच्या दिवशीच असा प्रकार समोर आल्याने जिल्ह्यात तणावाचे वातावरण असून, विरोधकांकडून यावर जोरदार टीका होण्याची शक्यता आहे. या प्रकरणावर आता तानाजी सावंत काय स्पष्टीकरण देतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

दरम्यान जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार यांना याबाबत विचारले असता, आपल्यापर्यंत अधिकृतपणे अद्याप कोणतीही तक्रार आली नसल्याचे त्यांनी 'संचार'शी बोलताना स्पष्ट केले.

बौद्धिकदृष्ट्या अक्षम व मानसिक आजारी व्यक्तींसाठी कायदे विषयक जनजागृती



धाराशिव (प्रतिनिधी) -तालुक्यातील खानापूर येथील नागनाथ निवासी मतिमंद विद्यालयात बौद्धिकदृष्ट्या अक्षम आणि मानसिकदृष्ट्या आजारी व्यक्तींसाठी कायदे विषयक जनजागृती कार्यक्रम जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या अध्यक्षा तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश अभिश्री देव यांच्या मार्गदर्शनाखाली आला.

घेण्यात जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, उस्मानाबाद व नागनाथ निवासी मतिमंद विद्यालय, खानापूर यांच्या कार्यसंयुक्त विद्यमाने आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षा तथा न्यायाधीश भाग्यश्री पाटील म्हणाल्या की, मानसिक आजार व बौद्धिक अक्षमता असलेल्या व्यक्तींसाठी शासनाच्या विविध योजना, त्यांचे हक्क व संरक्षण याबाबत सखोल मार्गदर्शन केले. दिव्यांग व्यक्तींनी कायदेशीर सल्ला व मार्गदर्शनासाठी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाशी संपर्क साधावा, असे आवाहन त्यांनी केले. यावेळी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचा मोफत टोल फ्री क्रमांक १५१००, तर बौद्धिकदृष्ट्या अक्षम व मानसिक विकलांग व्यक्तींसाठी क्रमांक १४४४६ याबाबत उपस्थितांमध्ये मदत जागृती करण्यात आली. तसेच बालकांसाठीच्या मदत वाणी (हेल्पलाईन) १०९८ विषयी माहिती देऊन दिव्यांग बालकांच्या प्रलंबित प्रश्नांची माहिती जाणून घेऊन ते प्रश्न संबंधित विभागाकडे पाठपुरावा करून लवकरात लवकर मार्गी लावावेत असे आवाहन त्यांनी केले.

या कार्यक्रमास अखिल भारतीय अपंग कल्याणकारी प्रसारक मंडळाचे अध्यक्ष चंद्रकांत जाधव, नागनाथ निवासी मतिमंद विद्यालयाचे सचिव राजेंद्र जाधव, मुख्याध्यापिका जयश्री कदम, नवनाथ निवासी विद्यालयाचे प्राचार्य पांडुरंग जाधव, उपमुख्य न्यायरक्षक अभय पाथूडकर, सहाय्यक न्यायरक्षक शुभम गाडे, पॅनल विधिज्ञ विश्वजीत शिंदे आदींची उपस्थिती होती. कायद्याची माहिती नसल्यामुळे अनेकजण आपल्या हक्कांपासून वंचित राहतात. त्यामुळे जिल्हा विधी सेवा प्राधिकरण सर्वसामान्य नागरिकांसाठी सदैव उपलब्ध असून मोफत विधिज्ञ व मोफत कायदे विषयक सल्ल्यासाठी नागरिकांनी संपर्क साधावा, असे आवाहन उपमुख्य न्यायरक्षक ड. अभय पाथरूडकर यांनी केले. तर सहाय्यक न्यायरक्षक ड. शुभम गाडे यांनी राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरणाच्या दिव्यांगांसाठीच्या योजना, विविध उपक्रम तसेच बालकांसाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांची माहिती त्यांनी दिली. अन्न हे शरीराचे पोषण करते आणि शिक्षण हे मनाचे पोषण करते. दोन्ही हक्क एकमेकांना पूरक असून भुकेले मूल शाळेत लक्ष केंद्रित करू शकत नाही आणि अशिक्षित व्यक्ती स्वतः साठी पुरेसे अन मिळवू शकत नाही, असे ड. विश्वजित शिंदे यांनी सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुधाकर कोळगे यांनी मानले. सहशिक्षक विनोद लांडगे यांनी तर उपस्थितांचे आभार शिक्षक या कार्यक्रमास विद्यालयातील शिक्षक, विद्यार्थी तसेच जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

किरकोळ कारणावरून तरुणावर कोयत्याने जीवघेणा हल्ला

लातूर / प्रतिनिधी- किरकोळ कारणावरून चौघाजणांनी एका २८ वर्षीय तरुणावरून कोयत्याने जीवघेणा हल्ला करून जखमी केल्याची घटना शहरापासून जवळच असलेल्या कव्हा शिवारातील रस्त्यावर बुधवारी दुपारी घडली आहे. या प्रकरणी लातूर ग्रामीण पोलीस ठाण्यात शुक्रवारी गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस तपास करीत आहेत.

फिर्यादी गोविंद चंद्रकांत कवरे याने दिलेल्या तक्रारीनुसार, बुधवारी दुपारी गोविंद कवरे व त्याचा मित्र जीवन सोनटक्के (दोघेही रा. जमालपूर, ता. औसा) हे दोघेजण दुचाकीवरून कव्हामार्गे जमालपूरला जात होते. चार वाजण्याच्या सुमारास कव्हा येथील अच्युत खंडागळे यांच्या शेताजवळील रस्त्यावर आरोपी आणि एका ट्रॅक्टर चालकासोबत वाद सुरू होता. ट्रॅक्टर रस्त्याच्या कडेला घेऊन वाद घाला, आम्हाला रस्ता सोडा, असे म्हणताच आरोपींनी तू दादा झाला आहेस का, असे म्हणत फिर्यादीला शिवीगाळ करत लाथा-बुक्क्याने मारहाण करण्यास सुरूवात केली. एवढ्यावरच न थांबता आरोपींनी कमरेला असलेले कोयते काढून फिर्यादीच्या उजव्या पायावर, डाव्या हाताच्या कोपरावर आणि मांडीवर कोयत्याने वार करून आरोपी घटनास्थळावरून पसार झाले. यात फिर्यादी गंभीर जखमी झाला. या घटनेत त्याचा मित्रही किरकोळ जखमी झाला आहे.

घटनेची माहिती मिळताच पोलीस निरीक्षक अरविंद पवार, पोलीस उपनिरीक्षक डोंगरे, पोलीस कॉन्स्टेबल तांबोळी यांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला. जखमी गोविंद कवरे याला तत्काळ लातूरच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले. यानंतर फिर्यादीच्या नातेवाईकांनी त्याला शहरातील एका खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले.

फिर्यादी गोविंद चंद्रकांत कवरे याने दिलेल्या जवाबावरून आरोपी बाला उर्फ रोहित सारगे, अर्जुन फुलबोयणे, बबलू उर्फ अजय कवरे व राहुल सारगे (सर्व रा. कव्हा, ता. लातूर) यांच्याविरुध्द गुरुवारी रात्री लातूर ग्रामीण पोलीस ठाण्यात विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपींना अद्याप अटक करण्यात आली नाही. तपास पोलीस उपनिरीक्षक डोंगरे हे करीत आहेत. किरकोळ कारणावरून एका तरुणावर कोयत्याने भरदिवसा जीवघेणा हल्ला केल्याने परिसरात चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

माथेरानच्या ई-रिक्षांचा १० तारखेपासून बंद

माथेरान : हातरिक्षाच्या अमानवीय प्रथेतून श्रमिकांना कायमस्वरूपी मुक्ती मिळावी, यासाठी सर्वोच्च न्यायालयाने सद्य:स्थितीत सुरू असलेल्या सर्वच हातरिक्षा बंद करून ई-रिक्षांच्या संख्येत वाढ करावी, असे स्पष्ट आदेश दिलेले असताना देखील राज्य सरकारने याबाबत काहीही ठोस उपाययोजना केलेली नाही. त्यामुळे श्रमिक रिक्षा संघटनेने दि. १० फेब्रुवारीपासून माथेरानमधील सर्वच रिक्षा बंद करण्याचा निर्णय घेतला आहे.

याबाबत विविध संबंधित अधिकारीवर्गाला संघटनेच्या पदाधिका-यांनी निवेदन सादर केले आहे. या बंददरम्यान शालेय विद्यार्थ्यांना आणि रुग्णांसाठीच ही सेवा उपलब्ध असणार आहे. याव्यतिरिक्त अन्य कुणालाही या सेवेचा लाभ दिला जाणार नाही, असेही संघटनेकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

सर्वोच्च न्यायालयाने माथेरानमधील सर्व ९४ हातरिक्षा कायमस्वरूपी बंद करून सहा महिन्यांत त्यांचे पुनर्वसन करण्याचे स्पष्ट निर्देश दिले असून, ई-रिक्षांच्या संख्येत वाढ करण्याची जबाबदारी राज्य सरकारवर सोपविली आहे; परंतु सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाची अंमलबजावणी केली जात नसल्याने सर्वच रिक्षा बंद करण्याचा निर्णय संघटनेने घेतला आहे. हा बंद बेमुदत असणार आहे.

डॉ. शिंदे जेएसपीएम विद्यापीठाच्या स्ट्रॅटेजिक ॲडव्हायझर अध्यक्षपदी

धाराशिव (प्रतिनिधी) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे माजी अध्यक्ष तथा देशातील नामवंत शिक्षणतज्ज्ञ डॉ. देवानंद शिंदे यांची पुणे येथील जेएसपीएम विद्यापीठाच्या स्ट्रॅटेजिक ॲडव्हायझर अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

धाराशिव तालुक्यातील शिंगोली चे सुपुत्र डॉ. देवानंद शिंदे निवड झाल्याने त्यांच्या अनुभवाचा आणि कर्तृत्वचा जेएसपीएम विद्यापीठाला नक्कीच उपयोग होईल. त्यांच्या या निवडी मुळे जिल्ह्यात सर्वत्र आनंद व्यक्त केला जात आहे. डॉ. शिंदे यांनी यापूर्वी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे अध्यक्ष तर मुंबई विद्यापीठ, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ आदींची कुलगुरू म्हणून जबाबदारी सांभाळली आहे. याबरोबरच ते राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोगाचे सदस्य राहिले असून केंद्र सरकारच्या कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयात स्वतंत्र संचालक म्हणूनही त्यांनी कार्य केले आहे.



सध्या ते महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ, आयसीटी स्टेट युनिव्हर्सिटी मुंबई, मल्ला रेड्डी विश्व विद्यापीठ (हैदराबाद), कृष्णा विद्यापीठ कराड, एमजीएम विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर आदी संस्थांच्या शैक्षणिक प्रशासनात मार्गदर्शक भूमिका बजावत आहेत.. डॉ शिंदे हे आंतरराष्ट्रीय दर्जाचे शिक्षण तज्ञ आहेत. त्यांनी आतापर्यंत विविध पदांवर यशस्वीपणे जबाबदाऱ्या पार पाडल्या आहेत. शिक्षण तज्ञ, संशोधक, शैक्षणिक व्यवस्थापनातील प्रदीर्घ ऐन अनुभव त्यांच्या पाठीशी आहे. उच्च शिक्षणातील संशोधन आणि विद्यापीठीय व्यवस्थापन यात त्यांचा हातखंडा राहिला आहे. त्यांनी आतापर्यंत व्यक्तिगत कौशल्य विकास व्यवस्थापन तसेच शिक्षण क्षेत्रातील विकासात्मक आणि प्रोत्साहनात्मक भूमिकेतून शिक्षणा सारख्या क्षेत्रात अनेक प्रयोग यशस्वी केली आहेत. ते एक उत्तम संवादक आणि संघटक आहेत. केमिकल टेक्नॉलॉजी विषयाचे प्राध्यापक असलेले डॉ शिंदे युनिव्हर्सिटी ऑफ ऑक्सफर्डचे व्हिजिटिंग स्कॉलर आहेत. त्यांच्या नावावर ६ पेटंट असून त्यांची चार पुस्तके प्रकाशित झाली आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली २३ विद्यार्थ्यांनी पी एच डी पदवी प्राप्त केली आहे. त्यांनी आता पर्यंत विविध १४१ परिषदांमध्ये भाग घेतला असून सहा परिषदांचे आयोजन केले आहे. त्यांनी आतापर्यंत १४५ वैज्ञानिक परिषदां, कार्यशाळा, रिफ्रेशर कोर्स आदी मध्ये व्याख्याने दिली आहेत. भारतातील ३३ विद्यापीठामध्ये पीएचडी चे तज्ञ म्हणून काम पाहिले आहे.

शहापूर गटाचा आजपर्यंत झाला नाही असा विकास करण्यासाठी महायुतीच्या उमेदवारांनाच विजयी करा : बनसोडे

नळदुर्ग (प्रतिनिधी) जिल्हा परिषद गट व पंचायत समिती गणाची निवडणूक अंतिम टप्प्यात आले आहे. या मतदारसंघांमध्ये अनेक समस्या असून त्या कोणीही सोडवलेले नाही. मी महायुतीच्या माध्यमातून शिवसेनेच्या धनुष्यबाण या चिन्हावर निवडणूक लढवीत आहे. मतदारांशी डोअर टू डोअर संपर्क होत असून प्रतिसाद चांगला मिळत आहे. माझा विजय निश्चित असून शहापूर जिल्हा परिषद गटाचा आजपर्यंत कोणीही केला नाही असा विकास करणार असल्याचे आश्वासन शिवसेना - भाजप महायुतीचे उमेदवार सुनील बनसोडे यांनी दि.६ फेब्रुवारी रोजी दिले.

पुढे बोलताना बनसोडे म्हणाले की, शिवसेना-भाजप महायुतीच्या माध्यमातून आ राणाजगजितसिंह पाटील यांनी मला या निवडणुकीच्या रिंगणात उतरविले आहे. मला शिवसेनेचे धनुष्यबाण हे चिन्ह दिले असून या भागामध्ये महायुतीचा मतदार मोठ्या प्रम प्रमाणात आहे. मी उमेदवारी घेतल्याच्या दुसऱ्या दिवसापासून या मतदार संघातील प्रत्येक गावांमधील प्रत्येक समाज घटकातील व्यक्तींच्या घरी जाऊन त्यांच्या वैयक्तिक समस्या विचारण्यावर भर देत आहे. मात्र, ते सार्वजनिक समस्या सोडवाव्यात असा आग्रह धरीत आहेत. या समस्यांमध्ये जिल्हा परिषद शाळांच्या वर्ग खोल्या व्यवस्थित करणे, प्राथमिक आरोग्य केंद्राचा दर्जा सुधारणे आणि त्यामध्ये सर्व प्रकारची स्वरूपाच्या औषधे उपलब्ध देऊन कर्मचाऱ्यांना राहण्यासाठी व्यवस्था करणे, तसेच शेत रस्ते



व ग्रामीण रस्त्यांची कामे करणे. गावांतर्गत रस्ते व घनकचऱ्याचा प्रश्न सोडविण्यासह शासनाच्या योजना आदींचा समावेश आहे. महत्वाचे म्हणजे मला ग्रामीण भागातील प्रश्नांची अगदी जवळून जाण असून त्या सोडविण्यासाठी आमदार राणाजगजितसिंह पाटील, जिल्हा परिषदेच्या माजी उपाध्यक्ष अर्चनाताई पाटील व युवा नेते मल्हार पाटील यांच्या नेतृत्व मार्गदर्शनाखाली नक्कीच पूर्ण करण्याचा प्रयत्न करणार असल्याचा ठाम विश्वास बनसोडे यांनी व्यक्त केला. विशेष म्हणजे या मतदारसंघांमध्ये माझ्यासमोर विरोधकांचे कुठल्याही स्वरूपाचे आव्हान नाही. कारण त्यांना ग्रामीण भागाची जाण नसून त्यांच्या समस्या काय आहेत ह्या समजून घेण्याचा त्यांनी कधी प्रयत्न केला नाही व करणार देखील नसल्याचे त्यांनी सांगितले. त्यामुळे या निवडणुकीमध्ये मतदारांनी जिल्हा परिषद गट व दोन्ही पंचायत समिती गणातील उमेदवारांना मोठ्या विजयी करावे असे आवाहन बनसोडे यांनी केले.

माजी मंत्री चव्हाण यांनी बजावला मतदानाचा हक्क

तुळजापूर, दि. ७ - तुळजापूर तालुक्यातील अणदूर जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी माजी मंत्री मधुकरराव चव्हाण तथा काँग्रेसचे ज्येष्ठ नेते यांनी वयाच्या ९३ व्या वर्षीही लोकशाही प्रति निष्ठा कायम ठेवून मतदानाचा हक्क बजावला. हा आदर्श मतदारांना प्रेरणा देणारा म्हणावा लागेल. चव्हाण हे अणदूर ग्रामपंचायत सदस्य, पंचायत समिती सभापती ते राज्याचे मंत्री, राज्य शिखर बँकेचे अध्यक्ष, परिवहन मंत्री, विधान सभेचे उपसभापती अशा विविध पदावर काम करून सर्वसामान्यांना न्याय देण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला. यावेळी बोलताना ते म्हणाले की, लोकशाही बळकट ठेवण्यासाठी प्रत्येक नागरिकांनी मतदान करणे आवश्यक असल्याची भावना व्यक्त केली.

ऑल इंडिया पँथर सेनेचा सांजा जिल्हा परिषद गटामध्ये शिवसेना (ठाकरे) ला जाहीर पाठिंबा



धाराशिव (प्रतिनिधी) जिल्हा परिषद सार्वत्रिक निवडणुकीसाठी ऑल इंडिया पँथर सेनेच्यावतीने जिल्हाध्यक्ष धनंजय हुंबे अनसुर्डेकर यांनी शिवसेना (ठाकरे) ला बिनशर्त जाहीर पाठिंबा जाहीर पाठींबा दिला आहे. त्यामुळे सांजा जिल्हा परिषद गटातील प्रदिप सुभाष घोणे व सांजा पंचायत समिती गणाच्या आशा राजदीप गायकवाड तसेच चिखली पंचायत समिती गणाचे उमेदवार सुरेश कोळी यांच्यासह इतर उमेदवारांना फायदा होणार आहे.

दिलेल्या पाठिंबामध्ये असे नमूद करण्यात आले आहे की, शिवसेना (ठाकरे) पक्षाच्या उमेदवारांना ऑल इंडिया पँथर सेनेचा जाहीर पाठिंबा देत आहोत. त्यामुळे ऑल इंडिया पँथर सेनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते व हितचिंतक यांना आवाहन करण्यात येते की, शिवसेना (ठाकरे) पक्षाच्या उमेदवारास भरघोस मतांनी निवडून देऊन विजयी करावे असे आवाहन जिल्हाध्यक्ष हुंबे अनसुर्डेकर यांनी केले आहे.

नागपूर येथे संपन्न झालेल्या रायसोनी करंडक राज्यस्तरीय एकांकीका स्पर्धेत राजर्षी शाहू महाविद्यालयाचे उज्वल यश



लातूर(प्रतिनिधी) रायसोनी फाऊंडेशन नागपूर यांच्या वतीने आयोजित जी.एच. रायसोनी करंडक राज्यस्तरीय आंतर महाविद्यालयीन एकांकीका स्पर्धेत राजर्षी शाहू महाविद्यालयाच्या संघाने उल्लेखनिय कामगिरी करत यश संपादन केले.

या स्पर्धेत महाराष्ट्रातील विविध महाविद्यालयाच्या ३५ संघानी आपल्या एकांकीकेचे सादरीकरण केले होते. राजर्षी शाहू महाविद्यालयाच्या संघाने 'ड्रायव्हर' ही एकांकीका सादर करून रसिक प्रेक्षकांबरोबरच परीक्षकांचीही दाद मिळवत रोख ५१,०००/- रू. यांचे सांघिक सर्वतृतीय पारितोषिक मिळवून घवघवीत यश संपादन केले.

या शिवाय नाटकातील उत्कृष्ट संगीत संयोजनासाठी सागर शिंदे या विद्यार्थ्यांला रोख ५००० /- रू. चे प्रथम पारितोषिक, संदीप घुगरे याला पुरूष अभिनयासाठी सर्वतृतीय व उत्कृष्ट नाटय दिग्दर्शनाबददल द्वितीय अशी क्रमश: दोन व तीन हजाराची पारितोषिके पटकावली. नाटय लेखक अमोल साळवी लिखीत 'ड्रायव्हर' या एकांकीके मध्ये संदीप घुगरे, निकिता कोकाटे, आकांक्षा सारंगे, प्रतिक वाघमारे यांच्या प्रमुख भूमिका होत्या. त्याचबरोबर अप्रतिम अशी ध्वनी व प्रकाश योजना शिवम सुतार, सागर शिंदे यांचे संगीत, उत्तम नेपथ्य गणेश झिपरे, उत्कृष्ट रंग व वेशभूषा श्रीराम शिंगण यांनी केलेली होती.

या यशाबददल शिवछत्रपती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. डॉ. गोपाळराव पाटील, सचिव प्राचार्य अनिरूध्द जाधव, प्राचार्य महादेव गव्हाणे, उपप्राचार्य प्रा. सदाशिव शिंदे, पर्यवेक्षक डॉ. भीमराव पाटील सांस्कृतिक विभागप्रमुख प्रा. हरिसर्वोत्तम जोशी, संघ व्यवस्थापक प्रा. वैभव माने यांनी अभिनंदन केले.

राष्ट्रीय हॅकाथॉनमध्ये शिवलिंगेश्वर फार्मसी च्या विद्यार्थ्यांची बाजी; २५ हजारांचे तृतीय पारितोषिक पटकावले



औसा (प्रतिनिधी) कोयंबतूर (तामिळनाडू) येथे दि. २९ ते ३१ जानेवारी २०२६ दरम्यान आयोजित करण्यात आलेल्या कुमारगुरू लाइव्हस्टॉक हॅकाथॉन २०२६ या राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत शिवलिंगेश्वर कॉलेज ऑफ फार्मसी, आलमला, ता. औसा जि. लातूर या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले.

या स्पर्धेत देशभरातील विविध महाविद्यालयांनी सहभाग घेतला होता. यामध्ये कृषी विज्ञान श्रेणी अंतर्गत 'पशु आरोग्यासाठी हर्बल प्रतिबंधात्मक स्प्रेचे डिझाइन आणि प्रमाणीकरण उपाययोजना विकसित करणे' असे आव्हानात्मक कार्य विद्यार्थ्यांना देण्यात आले होते. सदरील महाविद्यालयातील विषाल वाडेकर आणि आचल मुलगीर या विद्यार्थ्यांनी प्रा. विद्या कपसे (येलम) यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभावी प्रकल्प सादर करून तृतीय क्रमांक क्रमांकाचे पारितोषिक रोख रक्कम रु. २५,०००/- (पंचवीस हजार रुपये) आणि प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले. या स्पर्धेत देशभरातील विविध महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता.

या यशाबद्दल संस्थेच्या वतीने संस्थेचे अध्यक्ष शिवचरण धाराशिवे, उपाध्यक्ष प्रभाकर कापसे, सचिव बसवराज धाराशिवे, सहसचिव महादेव खिचडे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ विश्वेश्वर धाराशिवे, दगडोजीराव देशमुख डी फार्मसी चे प्राचार्य डॉ कैलास कापसे यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शकांचे अभिनंदन करुन विद्यार्थ्यांना राष्ट्रीय स्तरावर मिळवलेले हे यश महाविद्यालयासाठी आणि संपूर्ण जिल्ह्यासाठी अभिमानास्पद असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेत अग्रेसर

धाराशिव (प्रतिनिधी) आयुष्यमान भारत महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीत शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, धाराशिव यांनी उल्लेखनीय कामगिरी करत नवीन वैद्यकीय महाविद्यालयांच्या तुलनेत प्रथम क्रमांक पटकावला आहे. या योजनेंतर्गत गेल्या तीन वर्षांत एकूण २,४८३ रुग्णांवर मोफत उपचार करण्यात आले असून शासनाकडे ३ कोटी ७४

लाख २५ हजार २११ रुपये विमा रक्कम जमा झाली आहे. या योजनेंतर्गत सन २०२३ मध्ये ८६१ रुग्णांवर, सन २०२४ मध्ये १,०५० रुग्णांवर तर २०२५ मध्ये लक्षणीय वाढ वैद्यकीय महाविद्यालयांपैकी वैद्यकीय होतान एकूण २,४८३ रुग्णांबर मोफत उपचार करण्यात आले. ही आकडेवारी नवीन शासकीय महाविद्यालय व रुग्णालयाची असून रुग्णालयाच्या कार्यक्षम व्यवस्थापनाचे द्योतक आहे. या यशामागे अधिष्ठाता डॉ. शैलेंद्र

चौहान यांच्या मार्गदर्शनात वैद्यकीय अधीक्षक डॉ. तानाजी लाकाळ, डॉ. स्मिता गवळी व अधिसेविका यांचे काटेकोर नियोजन, प्रशासन व समन्वय महत्त्वाचा ठरला अधिष्ठाता यांच्या नेतृत्वाखाली मागील वर्षात २,४८३ रुग्णांना या योजनेचा मोफत लाभमिळाला.

मेडिसीन, बालरोग, सर्जरी, अस्थिरोग, स्त्रीरोग, नेत्ररोग, ईएनटी, ऍनस्थेसिया, रेडिओलॉजी, पॅथॉलॉजी, बायोकेमिस्ट्री व

मायक्रोबायोलॉजी या सर्व विभागांचे या यशात मोलाचे सहकार्य लाभले. तसेच विभाग प्रमुख डॉ. प्रविणकुमार गोवंदे, निवासी वैद्यकीय अधिकारी व वैद्यकीय समन्वयक डॉ. दत्ता चौरे व डॉ साजीद शेख, डेटा एन्ट्री ऑपरेटर श्री. सत्यजित मुळे, सदाशिव कांबळे व सारिका शिंगाडे, आरोग्य मित्र व स्टाफ नर्सेस यांनी सातत्याने मेहनत घेतली. योजनेचे प्रमुख डॉ. ओमप्रकाश शेटे यांच्या मार्गदर्शनामुळे ही योजना अधिक प्रभावीपणे सामान्य रुग्णांपर्यंत पोहोचली सध्यस्थितीत रुग्णालयात आधुनिक उपचार यंत्रणा कार्यान्वित ठेवण्यात आली असून प्रशिक्षणार्थी डॉक्टर्स, नियमित वैद्यकीय अधिकारी यांच्या माध्यमातून दररोज रुग्ण तपासणी व उपचार समाधानकारक पद्धतीने सुरू आहेत. रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांकडून उपचारांबाबत सकारात्मक प्रतिक्रिया व्यक्त होत आहेत. सामाजिक व आरोग्यविषयक कार्यक्रमांमध्येही रुग्णालयाचा उत्स्फूर्त सहभाग असून समाजात आरोग्यविषयक जनजागृतीत रुग्णालयाची महत्त्वाची भूमिका आहे. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांची संख्या दिवसेदिवस जिल्ह्यासह परिसरातून विविध वाढत आहे. आजूबाजूच्या शस्त्रक्रिया आजारांवरील उपचारासाठी नागरिक मोठ्या संख्येने रुग्णा येथे दाखल होत असल्याचे त्यांनी सांगितले. उपलब्ध साधनसामग्री व मनुष्यबळाचे योग्य नियोजन करून रुग्णालय व्यवस्थापन रुग्णांना मोफत सेवा देण्यासाठी सतत कार्यरत आहे. शासनाच्या योजनांचा लाभ रुग्णांना सहज मिळावा यासाठी यंत्रणा सदैव सतर्क ठेवून योजनेअंतर्गत मोफत उपचार केले जात आहेत. त्यामुळेच नवीन असले तरी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय है कार्यक्षमतेत अव्वल ठरले आहे.

होमगार्ड बनसोडे यांचा प्रामाणिकपणा पत्रकाराचा मोबाईल परत केला



लातूर, प्रतिनिधी- येथील पत्रकार शहाजी पवार यांचा अनावधानाने रस्त्यावर पडलेला मोबाईल हामगार्डच्या सतर्कतेने मिळाला. या प्रामाणिकपणाचे कौतूक होत आहे.

शुक्रवारी (दि.६) रोजी दुपारी शहाजी पवार हे महात्मा बसवेश्वर चौकातून स्कुटवरुन जात होते यावेळी त्यांच्या खिशातील मोबाईल अनावधानाने रोडवर पडला. त्यावेळी म. बसवेश्वर चौकात कर्तव्यावर असलेले होमगार्ड जी.एस. बनसोडे यांना तो सापडला. पवार यांना मोबाईल खिशात नसल्याचे कळाले त्यांनी अन्य मोबाईलवरुन फोन केला व बनसोडे यांनी तो घेतला .त्यांना चौकात मोबाईल सापल्याचे सांगितले. बसवेश्वर चौकातील चौकीत बनसोडे व त्यांचे सहकारी मनोज होळकर यांनी तो पवार यांना दिला. पवार यांनी त्यांच्याप्रति कृतज्ञता व्यक्त करीत पोलिस अधिक्षक अमोल तांबे यांना याबाबत फोनवरुन सांगितले त्यांनीही बनसोडे यांच्या प्रामिणकपणाचे कौतूक केले.

टोमॅटो आणि मटारच्या दरात घसरण; गृहिणींना दिलासा!



नवी मुंबई : आवक वाढल्यामुळे भाजीपाल्याच्या दरामध्ये घसरण झाली आहे. मटार ४० रुपये किलो, तर टोमॅटो ३० ते ४० रुपये किलो दराने किरकोळ मार्केटमध्ये उपलब्ध होत आहेत. कोबी, फ्लॉवर, दुधी भोपळा व इतर वस्तूंचे दरही कमी झाल्यामुळे ग्राहकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

लोणावळा घाटात झालेल्या अपघातामुळे दोन दिवस मुंबई कृषि उत्पन्न बाजार समितीमध्ये भाजीपाल्यांची आवक कमी झाली होती. वाहतूक सुरळीत झाल्यानंतर शुक्रवारी आवक पूर्ववत झाली आहे. नाशिक, पुणे, सातारा व इतर ठिकाणावरून ५८७ ट्रक, टेम्पोमधून ३२०० टन आवक झाली आहे. यामध्ये सर्वाधिक ४२८ टन टोमॅटोची आवक झाली आहे. घाऊक बाजारात टोमॅटो १० ते २० रुपये व किरकोळ बाजारात ३० ते ४० रुपये किलो दराने विकला जात आहे.

एपीएमसीत ३५८ टन वाटाण्याची आवक झाली. घाऊक बाजारात वाटाणा २२ ते २६ रु. किलो व किरकोळमध्ये ४० ते ५० रु. किलो दराने विक्री होत आहे. दुधी भोपळा, वांगी, कारली, कोबी, फ्लॉवर, ढोबळी मिरची या सर्वांचे दर प्रतिकिलो शंभर रुपयांपेक्षा कमी आहेत.

गवारचे भाव अद्यापही तेजीत गवारचे दर अद्याप तेजीत आहेत. घाऊक बाजारात ५० ते ८० व किरकोळमध्ये १४० ते १६० रुपये किलो दराने विक्री होत आहे. किरकोळ बाजारात शिराळी-दोडका १४० ते १६० रुपये, तोंडली १२० ते १६० रुपये किलो दराने विकली जात आहेत. याव्यतिरिक्त इतर वस्तूंचे दर सर्वसामान्यांच्या आवाक्यात आले आहेत.



दयानंद विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांचा परीक्षा पे चर्चा कार्यक्रमात उस्फूर्त सहभाग

लातूर : येथील दयानंद विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी दि.०६ फेब्रुवारी २०२६ रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ' परीक्षा पे चर्चा ' च्या निमित्ताने विद्यार्थ्यांशी साधलेल्या कार्यक्रमात उस्फूर्त सहभाग नोंदविला.या कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण विद्यार्थ्यांना दाखविण्यात आले.यात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विद्यार्थ्यांशी प्रेरणादायी व आत्मविश्वास वाढविणारा संवाद साधला.त्यांनी शिक्षक व विद्यार्थ्यांना अभ्यासाविषयी मार्गदर्शन केले.

याप्रसंगी महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ. सिद्धेश्वर बेल्ह्राळे, उपप्राचार्य प्रा.भाऊसाहेब सरवदे, पर्यवेक्षिका डॉ.संध्या कोल्हे, पर्यवेक्षक डॉ. हेमंत वरुडकर यांच्यासह इतर शिक्षक,शिक्षकेत्तर कर्मचारी व इयत्ता अकरावीचे विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

आ. कराड यांनी मतदानाचा हक्क बजावला; इतरांनाही मतदान करण्याचे केले आव्हान



लातूर दि. ०७ - लातूर जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीकरिता भाजपा नेते लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांनी लातूर तालुक्यातील मौजे रामेश्वर या आपल्या गावी कुटुंबीयासमवेत मतदान केले.

लोकशाहीच्या उत्सवात सर्व मतदार बंधू भगिनींनी उत्स्फूर्तपणे मतदान करून लोकशाही मजबूत करावी असे आवाहन त्यांनी केले.

जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुकीची प्रचार धुमाळी संपल्यानंतर आज शनिवारी संपूर्ण जिल्हाभरात मतदान होत आहे. लातूर ग्रामीण विधानसभेचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांनी लातूर तालुक्यातील मौजे रामेश्वर येथील मतदान केंद्रावर जाऊन आपल्या मतदानाचा हक्क संपूर्ण कुटुंबीय समवेत बजावला. यावेळी त्यांनी सर्व मतदार बंधू भगिनींनी मतदान करून लोकशाही मजबूत करावी असे आव्हान केले.

यावेळी आ. कराड यांच्यासमवेत सुविद्यपत्नी सौ. संजीवनीताई कराड, भाजपाचे युवा नेते ऋषिकेशदादा कराड, पृथ्वीराज कराड, रणवीर कराड यांच्यासह अनेक जण होते.

प्रा. मीरा बलभीम कोथिंबिरे यांना पी.एच.डी. प्रदान

लातूर दि. ०७ - डॉ. आंबेडकर विधी महाविद्यालयात कार्यरत असणाऱ्या सहा. प्रा. मीरा बलभीम कोथिंबिरे यांना विधी शाखेतील संशोधन कार्याबद्दल पी.एच. डी. पदवी घोषित करण्यात आली आहे. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड (एस. आर. टी. एम. यू. एन.) अंतर्गत असणाऱ्या श्री शिवाजी विधी महाविद्यालय, परभणी येथील संशोधन केंद्रातून त्यांना ही पदवी मिळालेली आहे.

त्यांचा ए स्टडी ऑफ कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी : इश्यूज अँड चॅलेंजेस विथ स्पेशल रेफरन्स टू टाटा मोटर्स इन इंडिया हा संशोधनाचा विषय होता. या संशोधनासाठी त्यांना डॉ. राजेश देशमुख यांचे मार्गदर्शन लाभले.

लातूर येथे हज यात्रेकरूंसाठी एकदिवसीय प्रशिक्षण शिबिर

लातूर, दि.७ - हज यात्रेवर जाणाऱ्या भाविक यात्रेकरूंसाठी योग्य मार्गदर्शन व तयारी व्हावी, या उद्देशाने बदर वेल्फेअर फाउंडेशन, लातूर यांच्या वतीने एकदिवसीय हज प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

हे शिबिर सोमवार, दिनांक ९ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ९ वाजल्यापासून असर नमाजेपर्यंत आयोजित करण्यात येणार आहे. शिबिराचे ठिकाण एम. के. फंक्शन हॉल, ६० फूट रोड, लातूर असे आहे. या प्रशिक्षण शिबिरात हज व उमराच्या विधी, एहराम, तवाफ, सई, वकूफ, तसेच मदीना मुनव्वराची जियारत याबाबत सविस्तर व सोप्या शब्दांत मार्गदर्शन करण्यात येणार आहे. या शिबिरासाठी हजरत मौलाना मुफ्ती आरिफ साहेब (बीड) हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित राहणार आहेत. तसेच हज कमिटी ऑफ इंडिया, मुंबई यांच्या मान्यताप्राप्त शासकीय हज प्रशिक्षकांकडून देखील मार्गदर्शन करण्यात येणार आहे. हज यात्रेकरूंना आवश्यक असलेले फॉर्म्स शिबिरस्थळी उपलब्ध करून दिले जाणार असून, महिलांसाठी पडद्याची विशेष व्यवस्था करण्यात आली आहे. संपर्कासाठी : अलहाज शुजाउद्दीन साहेब : ९७६४०४९४४१ अलहाज मुजम्मिल साहेब : ८०५५५५४४४७ हज यात्रेकरूंनी या प्रशिक्षण शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन बदर वेल्फेअर फाउंडेशन यांच्या वतीने करण्यात आले आहे.

राष्ट्रीय हॅकाथॉनमध्ये शिवलिंगेश्वर फार्मसी च्या विद्यार्थ्यांची बाजी; २५ हजारांचे तृतीय पारितोषिक पटकावले

औसा (प्रतिनिधी) कोयंबतूर (तामिळनाडू) येथे दि. २९ ते ३१ जानेवारी २०२६ दरम्यान आयोजित करण्यात आलेल्या कुमारगुरू लाइव्हस्टॉक हॅकाथॉन २०२६ या राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत शिवलिंगेश्वर कॉलेज ऑफ फार्मसी, आलमला, ता. औसा जि. लातूर या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले.

या स्पर्धेत देशभरातील विविध महाविद्यालयांनी सहभाग घेतला होता. यामध्ये कृषी विज्ञान श्रेणी अंतर्गत 'पशु आरोग्यासाठी हर्बल प्रतिबंधात्मक स्प्रेचे डिझाइन आणि प्रमाणीकरण उपाययोजना विकसित करणे' असे आव्हानात्मक कार्य विद्यार्थ्यांना देण्यात आले होते. सदरील महाविद्यालयातील विषाल वाडेकर आणि आचल मुलगीर या विद्यार्थ्यांनी प्रा. विद्या कपसे (येलम) यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभावी प्रकल्प सादर करून तृतीय क्रमांक क्रमांकाचे पारितोषिक रोख रक्कम रु. २५,०००/- (पंचवीस हजार रुपये) आणि प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले. या स्पर्धेत देशभरातील विविध महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता.

या यशाबद्दल संस्थेच्या वतीने संस्थेचे अध्यक्ष शिवचरण धाराशिवे, उपाध्यक्ष प्रभाकर कापसे, सचिव बसवराज धाराशिवे, सहसचिव महादेव खिचडे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ विश्वेश्वर धाराशिवे, दगडोजीराव देशमुख डी फार्मसी चे प्राचार्य डॉ कैलास कापसे यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शकांचे अभिनंदन करुन विद्यार्थ्यांना राष्ट्रीय स्तरावर मिळवलेले हे यश महाविद्यालयासाठी आणि संपूर्ण जिल्ह्यासाठी अभिमानास्पद असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

देगलूर महाविद्यालयातील तीन एनसीसी कॅडेट्स ची भारतीय सैन्य दलात निवड

देगलूर (प्रतिनिधी):येथील देगलूर महाविद्यालयाचे तीन एन.सी.सी. चे कॅडेट प्रतीक कोंकेवार (सी आर पी एफ), दुब्बेवार ईश्वर (अग्निवीर) तसेच बोलेगावे रितेश (इंडियन नेव्ही) यांची भारतीय विविध सैन्य दलात निवड झाली आहे.



तिन्ही कॅडेट्स हे एका शेतकरी, कष्टकरी कुटुंबातील असून, त्यांनी या यशाला गवसणी घातली आहे. त्यांना देगलूर महाविद्यालयाचे एन.सी.सी अधिकारी कॅप्टन डॉ.निरज उपलंचवार यांचे मार्गदर्शन लाभले आहे.यांचे संस्थेचे पदाधिकारी व प्राचार्य यांच्या हस्ते शाल व पुष्पगुच्छ देऊन यांचा सत्कार करण्यात आला.या यशाबद्दल अडत व्यापारी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रकाश पाटील बेम्बरेकर

उपाध्यक्ष जनार्धन चिद्रावार, सचिव डॉ. कर्मवीर उनग्रतवार, सहसचिव राजकुमार महाजन, कोषाध्यक्ष विलास तोटावार यांच्यासह संस्थेच्या कार्यकारिणी मंडळाचे सदस्य देवेंद्र मोतेवार, सूर्यकांत नारलावार, गंगाधरराव जोशी, रविंद्र अप्पा द्याडे, चंद्रकांत नारलावार, गुरुराज चिद्रावार, विजय उनग्रतवार, सुभाषराव सांगवीकर, यांच्यासह महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मोहन खताळ, उपप्राचार्य डॉ. अनिल चिद्रावार, उपप्राचार्य प्रा. चमकुडे एम.एम. उपप्राचार्य डॉ.शेरिकर व्ही. जी., पर्यवेक्षक श्री संग्राम पाटील, सर्व प्राध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थ्यानी अभिनंदन केले आहे.